P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट दिनांक - ०८/०९/२०२३**

## पिंपरी पोलीस ठाणे हद्दीत हातभट्टी दारु तयार करुन विकणाऱ्या कुप्रसिध्द गुन्हेगारास मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी "एम.पी.डी.ए. कायदयान्वये केली स्थानबद्धतेची" कारवाई.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे यांनी पोलीस आयुक्तालयाचे हद्दित गुन्हे करणारे गुन्हेगार यांचा अभिलेख तपासून त्यांचेवर परीणामकारक व कठोर कारवाई करण्याचे आदेश दिलेले असून त्याप्रमाणे कारवाई सुरू करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पिंपरी पोलीस ठाणेचे अभिलेख तपासुन अभिलेखावरील सराईत गुन्हेगार नामे, **किरण रमजान माचरे,** वय-४२ वर्षे, रा. ८/१ भाटनगर, पिंपरी, पुणे, याने **गावठी हातभट्टीची दारू तयार करणे, विक्री करणे** अशा प्रकारचे गुन्हे केलेले आहेत.

**सदर गुन्हेगारावर एकुण ०५ गुन्हे दाखल आहेत.** प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे, पिंपरी चिंचवड** यांनी नमुद इसमाचे विरुध्द **एम.पी.डी.ए. कायद्यान्वये येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा येथे दिनांक ०५/०९/२०२३ रोजी पासून स्थानबध्दतेचे आदेश** पारीत केले आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, पोलीस सह आयुक्त डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) श्रीम. स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त परि-०१ श्री. विवेक पाटील, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-१) श्री. बाळासाहेब कोपनर,सहा.पोलीस आयुक्त (पिंपरी विभाग) श्री. सतिश कसबे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.राम राजमाने (पिंपरी पो.स्टे.), वरिष्ठ पोलीस निरीक्षक (पी.सी.बी.गुन्हे शाखा), पोलीस हवालदार सचिन चव्हाण, पो.ना. कारभारी (पी.सी.बी.गुन्हे शाखा), स.पो.फौ.अनिल गायकवाड, पो.ना. ओंकार बंड (पिंपरी पो.स्टे.), यांनी केली आहे.

मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी वरील प्रमाणे गुन्हे करणा-या गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे अवलंबिले आहे. एम.पी.डी.ए.कायदयान्वये स्थानबद्धतेची **एकूण ५** कारवाई करण्यात आलेल्या असून यापुढे ही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

**आरोपी विरूध्द दाखल असलेले गुन्हे**

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ४१४/२०२० | महा.प्रो.ॲ.क. ६५ (ई) |
| २ | पिंपरी | ७३९/२०२२ | महा.प्रो.ॲ.क. ६५ (ई) |
| ३ | पिंपरी | ९२९/२०२२ | महा.प्रो.ॲ.क. ६५ (ई) |
| ४ | पिंपरी | २२६/२०२३ | महा.प्रो.ॲ.क. ६५ (ई) |
| ५ | पिंपरी | २४३/२०२३ | महा.प्रो.ॲ.क. ६५ (ई) |

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड आयुक्तालय